सं.फौ.मा.क्र. १७६/२०२३
सरकार -वि- दादाजी वेट्टी
**न्यायनिर्णय नि.क्र. २५**

दाखल तारीख ०९/०५/२०२३
नोंदणी तारीख ०९/०५/२०२३
निकाल तारीख २४/०३/२०२६
कालावधी ०२वर्षे,१०म,१५दि

## भाग अ
## (न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)
## {फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)}

| | |
|---|---|
| | **निशाणी क्र.२५** |
| **कोर्ट विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, चामोर्शी यांचे न्यायालय** पिठासीन अधिकारी :- वाय.जे.वळवी | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र. २७३/२०२२<br>पोलिस स्टेशन आष्टी, |
| न्यायनिर्णयाची तारीख | २४/०३/२०२६ |
| प्रकरण क्रमांक | संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक १७६/२०२३ |
| | CNR No. **MHGA090003892023** |
| तक्रारकर्ता /अभियोग | महाराष्ट् शासन<br>मार्फत पोलिस स्टेशन, आष्टी. |
| प्रतिनिधीत्व करणार | **श्री.एस.एस.सलामे**<br>(सहायक सरकारी वकील) |
| आरोपी | दादाजी गणु वेट्टी,<br>वय ५६ वर्षे, व्यवसाय- मजुरी,<br>रा. सगणापुर,<br>ता. चामोर्शी, जि.गडचिरोली. |
| प्रतिनिधीत्व करणार | **श्री. ए. जे. उंदिरवाडे**<br>(बचाव पक्षातर्फे वकील) |

## भाग ब
## {फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२)}

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १८/११/२०२२ |
| पहिल्या खबरीची तारीख | १८/११/२०२२ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | ०९/०५/२०२३ |
| दोषरोपनिश्चीती तारीख | १५/०१/२०२४ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | १२/०२/२०२४ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | २४/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | २४/०३/२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | -- |

**आरोपीबाबत तपशील**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिध्द की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | दादाजी गणु वेट्टी, | फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम४१ (अ)(१) नुसार सुचना पत्र दिल | ०९/०५ २०२३ | कलम ६५ (ई) म.दा.का. | निर्दोष मुक्त | लागु नाही. | लागु नाही. |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

| या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ | **फौजदारी संहिता** |
| भारतीय दंड विधान, १८६० | **दंड विधान** |
| भारतीय पुरावा अधिनियम, १९७२ | **पुरावा अधिनियम** |

**भाग क**

**{फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)}**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षदारांची यादी**

**अ. अभियोग पक्ष :**

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार** |
|---|---|---|
| सा.क्र. १ | प्रदिप नामदेव आत्राम | पंच |
| सा.क्रं. २ | प्रभाकर सखराम आत्राम | पंच |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने निशाणीबध्द दस्तांची यादी**

**ब. बचाव साक्षीदार, असल्यास :**

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचा स्वरूप** |
|---|---|---|
| --निरंक-- | | |

**क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :**

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचा स्वरूप** |
|---|---|---|
| --निरंक-- | | |

**सरकारपक्ष/बचाव/न्यायालयीन निशाणींची यादी**

**अ. सरकारपक्ष :**

| **अ.क्रमांक** | **निशानी क्रंमाक** | **विवरण** |
|---|---|---|
| १ | निशाणी/**पी-१५**/सा.क.१ | सुचनापत्रावरील |
| २ | निशाणी/**पी-१६**/सा.क.१ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सही |
| ३ | निशाणी/**पी-१७**/सा.क.१ | मालमत्ता शोध व जप्ती नमुन्यावरील सही |
| ४ | निशाणी/**पी-१९**/सा.क.२ | सुचनापत्रावरील |
| ५ | निशाणी/**पी-२०**/सा.क.२ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सही |
| ६ | निशाणी/**पी-२१**/सा.क.२ | मालमत्ता शोध व जप्ती नमुन्यावरील सही |

**ब. बचावपक्ष :**

| **अ.क्रमांक** | **निशानी क्रंमाक** | **विवरण** |
|---|---|---|
| | --निरंक-- | |

**क. न्यायालयीन निशाणी :**

| **अ.क्रमांक** | **निशानी क्रंमाक** | **विवरण** |
|---|---|---|
| | --निरंक-- | |

**ड. महत्वाच्या वस्तु :**

| **अ.क.** | **निशानी क्रंमाक** | **विवरण** |
|---|---|---|
| | **--निरंक--** | |

## न्यायनिर्णय

(आज दिनांक २४ **मार्च २०२६** रोजी घोषीत)

प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये चालविण्यात आला.

दिनांक १८.१२.२०२२ रोजी फिर्यादी पोलीस शिपाई रत्नदिप जगझापे व ईतर पोलीस कर्मचारी सिल साहित्यासह खाजगी वाहनाने मौजा येणापुर येथे प्रोव्ही रेडकामी फिरत असतांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मौजा सगणापुर येथील इसम नामे दादाजी वेट्टी हा त्याच्या राहते घरी अवैध्यरित्या हातभटटी गुळामोहा दारूची विक्री करीत आहे. सदरची माहिती प्रभारी अधिकारी यांना देवुन त्यांच्या आदेशान्वये ते व ईतर पोलीस कर्मचारी मौजा अडपल्ली चक येथील दोन स्थानिक पंचाना सोबत घेवुन दादाजी वेट्टी याच्या घरा समोर जावुन त्याला आवाज दिला असता एक ईसम घरा बाहेर आला. त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव दादाजी गणु वेट्टी असे सांगीतले. त्याला प्रोव्हीबाबतचे कारण सांगुन पंच व पोलीस स्टॉफ यांनी आपआपली अंग झडती देवुन त्याच्या घराची पंचासमक्ष पाहणी केली

असता त्याच्या घराच्या बैठकखोलीमध्ये ०५ लिटर क्षमतेच्या प्लास्टीक कॅनमध्ये ०५ हातभटटी गुळा मोहाची दारू विक्री किंमत २००/- प्रमाणे अंदाजे किंमत १०००/- चा माल मिळुन आला. त्यानंतर जप्त मालामधुन १८० मी.ली. मापाची एका बाटलमध्ये दारू रासायनिक विश्लेषणाकरीता वेगळी काढल्यानंतर ती पोलीसांच्या व पंचाच्या सहीने सील करण्यात आली. त्यानंतर पोलीस कर्मचारी नमुना बॉटल घेवुन पोलीस स्टेशनला परत आले. त्यानंतर फिर्यादी यांनी आरोपीविरुध्द फिर्याद दिली. सदर फिर्यादवरुन अपराध क्रं.२७३/२०२२ नुसार महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) अन्वये आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला.

३. सदर गुन्हयाचा तपास पोलिस हवालदार अनिरूध्द रामकिशन कुंडगीर यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे बयान नोंदविले व नमुना म्हणुन काढण्यात आलेली बॉटल रासायनिक प्रयोगशाळा नागपुर येथे पाठविला. तपासाअंती आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने त्यांनी महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमचे कलम ६५(ई) अंतर्गत दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे पुर्व पिठासिन अधिकारी यांनी निशानी क्र. ११ वर आरोपीविरुध्द आरोप निश्चीत केले. ते त्याला त्याच्या मातृभाषेत समजावुन सांगण्यात आल्यानंतर आरोपीनी आरोप अमान्य करुन खटल्याला सामोरे जाण्यास तयारी दर्शीविली.

५. माझ्या समक्ष विचारासाठी खालील मुद्दे उपस्थित झाले. मी प्रत्येक मुद्दयाच्या समोर माझे निष्कर्ष नोंदविल्यानंतर त्याबद्दलच्या कारणमिमांसेचे विवेचन केलेले आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दिनांक १८.११.२०२२ रोजी दुपारी ११.४५ ते १२.१५ वाजताचे दरम्यान मौजा सगणापुर, ता.चामोर्शी, जि. गडचिरोली येथे आरोपीच्या घराच्या बैठक खोलीतुन एका पांढ-या रंगाच्या ०५ लिटर क्षमतेच्या प्लास्टीक कॅनमध्ये ०५ लिटर हातभटटी गुळा मोहाची दारू विक्री किंमत २००/- प्रमाणे अंदाजे किंमत १०००/- चा माल विनापरवाना अवैध्यरित्या दारु विक्री करण्याच्या उददेशाने मिळून आल्याने आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमचे कलम ६५(ई) नुसार गुन्हा केला आहे असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| २ | अंतिम आदेश काय? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

६. आरोपीचा गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने एकुण दोन पंच साक्षदार तपासले. सदर दोन्ही पंच साक्षदारांनी अभियोग पक्षाला सहाय न केल्याने अभियोग पक्षाची पुराव्याची बाजु बंद करण्यात येवुन आरोपीचे फौ. प्र.सं. चे कलम ३१३ अंतर्गत जबाब नोंदविण्यात आले नाही.

**<u>मुद्दा क्र.१ व २ बाबत</u> :**

७. पंच साक्षीदार क्रं. १ प्रदिप नामदेव आत्राम व साक्षीदार क्रं.२ प्रभाकर सखाराम आत्राम यांनी त्यांच्या साक्षीमध्ये कथन केले की, ते आरोपीला ओळखतात. कारण की तो त्यांच्या गावचा आहे. दि.१८.११.२०२२ रोजी दारू जप्तीची कार्यवाही झाली नाही. सदर साक्षीदारांनी घटनास्थळ पंचनामा, मालमत्ता शोध व जप्ती पंचनामा व सुचनापत्रावर त्यांच्या सहया असुन त्यातील मजकुर माहित नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदारांनी अभियोग पक्षाला सहाय्य न केल्याने अभियोग पक्षातर्फे त्यांना फितुर घोषीत करुन सुचक प्रश्न विचारण्यात आले परंतु, त्यांना विचारण्यात आलेल्या सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तर दिले. त्यामुळे अभियोग पक्षाच्या बाजुने कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

८. पंच साक्षीदार क्र.१ व क्र.२ यांनी त्यांचे समक्ष दारू जप्ती करण्यात आली नसल्याचे कथन करुन जप्ती पंचनाम्यातील मजकुर माहित नसल्याचे कथन केले आहे. सदर प्रकरणात अभियोग पक्षाने जप्ती पंचनामा स्वतंत्र पंच साक्षीदारांच्या साक्षने सिध्द करणे गरजेचे होते, परंतु त्याप्रमाणे कोणताही स्वतंत्र पुरावा अभिलेखावर आला नाही. अभियोग पक्षाने आरोपीचा गुन्हा सिध्द करण्यासाठी सबळ व विश्वासार्ह पुरावा सादर केला नाही. अभिलेखावर उपलब्ध असलेला पुरावा आरोपीचा आरोप सिध्द करण्यास पुरेसा नाही. वरील कारणांमुळे आरोपीवरील लावण्यात आलेला दोषारोप संशयाच्यापलीकडे जावुन शाबीत होत नाही म्हणुन आरोपीला संशयाचा फायदा देवुन निर्दोष मुक्त करणे न्यायोचित होईल परिणामी मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देत आहे. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. म्हणून मी मुद्दा क्रं. २ च्या निष्कर्षाच्या अनुषगांने खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१ आरोपी दादाजी गणु वेट्टी, रा. सगणापुर, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली याला फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८ (१) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) या गुन्हयाच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२ जप्त मुददेमाल ०५ लिटर हातभटटी गुळा मोहाची दारु घटनास्थळावर नाश केली असल्याने त्याबाबत कोणताही आदेश नाही.

३ आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

४ आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७-अ प्रमाणे रक्कम रु. १५,०००/- चा नविन जमानती बंधपत्र दयावे. सदर बंधपत्राची मुदत पुढील सहा महिण्यापर्यत राहील. सदर कालावधीत आव्हान न झाल्यास बंधपत्र रद्द होईल.

५ न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

Digitally signed by YOGESHWAR VALVI
Date: 2026.03.24 18:15:16 +0530

चामोर्शी.
दिनांक : २४/०३/२०२६

{वाय.जे.वळवी}
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
चामोर्शी.

# <u>प्रमाणपत्र</u>

मी शपथेवर सांगतो की, पी.डी.एफ. न्यायनिर्णयामधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराप्रमाणे शब्द-न-शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव : सुचित निलंकठ खांडेकर
लघुलेखक (श्रेणी-३)

न्यायालयाचे नाव : दिवाणी व फौजदारी न्यायालय, चामोर्शी

न्यायानिर्णयाची तारीख : २४/०३/२०२६

मा. पिठासीन अधिकारी यांनी

न्यायनिर्णयावर सही केल्याची तारीख : २४/०३/२०२६

न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख : २४/०३/२०२६